लोकमत

# विद्यापीठातर्फे प्रियांका संकपाळ हिचा सत्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सीआयडी परीक्षेत राज्यात मुलींमध्ये पहिला क्रमांक पटकावलेल्या प्रियांका संकपाळ हिचा गुरुवारी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते सत्कार झाला. ती वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाची माजी विद्यार्थिनी आहे. यावेळी वृत्तपत्रविद्या विभागाच्या प्रमुख डॉ. निशा मुडे, डॉ. शिवाजी जाधव, सुमेधा साळुंखे, आदी उपस्थित होते.

प्रियांका म्हणाली, पत्रकारितेच्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतल्यानंतर मला अनेक विषयांची ओळख झाली. या विषयांचा अभ्यास करीत असताना स्पर्धा परीक्षेची तयारी करणे सोपे गेले. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्वत:ला ओळखले पाहिजे. सातत्याने प्रयत्न केल्यानंतर यश निश्चित मिळते

Hello Kolhapur
Page No. 3 Jul 27, 2018
Powered by: erelego.com

लोकमत

## सुरेश जांगे यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळा

# ग्रंथपालांनी समाजाचे दिग्दर्शन करावे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : ज्ञानस्रोत केंद्राच्या माध्यमातून ग्रंथपालांनी समाजाचे दिग्दर्शन करावे. विद्यार्थ्यांना सर्वोत्तम सेवा प्रदान करण्यासाठी ग्रंथालयामध्ये उपलब्ध माहितीचा शिक्षकांनी जास्तीत जास्त उपयोग करावा, असे प्रतिपादन गुलबर्गा विद्यापीठाचे प्रभारी ग्रंथपाल डॉ. सुरेश जांगे यांनी मंगळवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र व ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागाच्या ५५ व्या स्थापना दिवसानिमित्त विद्यापीठ ग्रंथालय आणि इन्फ्लीबनेट सेंटरतर्फे (गांधीनगर) आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते.

### एकसारखेपणा निर्माण होईल : डी. टी. शिर्के

या कार्यक्रमात प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठांतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयांनी ग्रंथालयाशी निगडित असलेली 'सोल' ही संगणकप्रणाली हाताळल्यास विद्यापीठ व महाविद्यालयांमधील ग्रंथालयांमध्ये एकसारखेपणा निर्माण होईल.

विद्यापीठाच्या 'आबालाल रेहमान आर्ट गॅलरी'मध्ये होणाऱ्या कार्यशाळेचा विषय 'इन्स्टिट्युशनल रिपॉजेटरी डिस्पेस व सोल- ग्रंथालय संगणकीकरण' असा होता. या कार्यशाळेचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी स्वप्निल पटेल, विजयकुमार श्रीमाळी प्रमुख उपस्थित होते.

डॉ. जांगे म्हणाले, महाविद्यालये व विद्यापीठातील ग्रंथालयांनी उद्याचे चांगले भविष्य घडविण्यासाठी बदल स्वीकारणे आवश्यक आहे. या माध्यमातून वापरकर्त्याला माहिती सेवा देण्यासाठी ग्रंथालयांनी प्रामुख्याने प्रयत्न करावेत. इन्फ्लीबनेट सेंटर, गांधीनगरचे शास्त्रज्ञ-सी (एलएस) एच. जी. होसमनी म्हणाले, ग्रंथालये म्हणजे विद्यार्थ्यांसाठी जगभरातील माहिती सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणारी मंदिरे आहेत. या ठिकाणी उपलब्ध होणाऱ्या माहितीच्या आधारे विद्यार्थ्यांच्या आयुष्याला चांगली दिशा मिळते.

यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाच्या माजी विभागप्रमुख डॉ. सुमित्रा जाधव, डॉ. एच. एम. बायदंडे यांचा सत्कार झाला. 'एम. लिब.'चे माजी विद्यार्थी श्यामला खोतलांडे, पी. सी. पाटील, एम. एस. शिरगावकर यांचा सत्कार झाला.

सहायक ग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर संपादित 'इसेंशियल ऑफ इन्फॉर्मेशन लिटरसी अँड इलेक्ट्रॉनिक इन्फॉर्मेशन लिटरसी फॉर इन्फॉर्मेशन सिकर' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. ग्रंथालय विभागप्रमुख डॉ. शालिनी लिहितकर यांनी प्रास्ताविक केले. विद्यापीठ ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत यांनी परिचय करून दिला. अलमास पेंढारी व भाग्यश्री गुरव यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. बिलावर यांनी आभार मानले.

# शिवाजी विद्यापीठामध्ये 'रवि तेजाचे कवडसे' कार्यक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागामार्फत डॉ. श्रीमती अंबुजा साळगावकर यांच्या मातोश्रींच्या नावे दिलेल्या संशोधन शिष्यवृत्ती निमित्त शुक्रवारी (दि.२७) दुपारी ४ वाजता मानव्यशास्त्र सभागृहामध्ये रविंद्रनाथ टागोरांच्या अनुवादीत मराठी रचनांचा 'रवि तेजाचे कवडसे' हा कार्यक्रम होणार आहे.

यावेळी गायक डॉ.अंजली निगवेकर आणि सहकलाकार यांचे सादरीकरण होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन अधिविभागप्रमुख डॉ.एन.व्ही.चिटणीस यांनी केले आहे.

सकाळ

# ‘दूर शिक्षण’मध्ये यंदा ११ अभ्यास केंद्रे



कोल्हापूर, ता. २६ : दूर शिक्षण केंद्राच्या अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत असल्याने शिवाजी विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयामध्ये यंदा ११ अभ्यास केंद्रांचा समावेश केला आहे. यात कोल्हापूर व सातारा जिल्ह्यात प्रत्येकी तीन व सांगली जिल्ह्यात पाच केंद्रांचा समावेश आहे. अभ्यास केंद्रांना प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याने केंद्रांची संख्या ७७ झाली आहे. कोल्हापूर जिल्ह्यात आर. बी. माडखोलकर महाविद्यालय (चंदगड), यशवंतराव चव्हाण महाविद्यालय (हलकर्णी), राजा शिवछत्रपती आर्टस, सायन्स महाविद्यालय (महागाव), सांगली जिल्ह्यात यशवंतराव चव्हाण आर्टस अँण्ड कॉमर्स कॉलेज (उरण, इस्लामपूर), आर्टस, कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेज (उमदी, ता. जत), चिंतामणराव कॉलेज ऑफ कॉमर्स (सांगली), देशभक्त आंनदराव बळवंतराव नाईक आर्टस अँड कॉमर्स कॉलेज (यशवंतनगर, चिखली), पंतगराव कदम कॉलेज (सांगलीवाडी, सांगली), सातारा जिल्ह्यात आर्टस अँण्ड कॉमर्स कॉलेज (कोयनानगर, ता. पाटण), श्रीमती मिलनबेन मेहता कॉलेज (पाचगणी) व प्रा. संभाजीराव कदम कॉलेज (देऊर, ता. कोरेगाव) यांचा समावेश आहे.

Kolhapur, Kolhapur-Today
27/07/2018 Page No. 8